
# मधुकर सोनवणे



# ईशावास्यउपनिषद



# ईशावास्योपनिषद

## काव्यमय भाष्य

# मधुकर वि. सोनवणे

# ईशावास्योपनिषद

मधुकर वि. सोनवणे

20, विजय नगर कॉलनी
नवा आडगाव नाका पंचवटी नाशिक-3
422003
फ़ोन: ९४२२२७५६३३३

**msonavane@hotmail.com**

हे पुस्तक प्रताधिकारमुक्त असून
आपण हे कायदेशीररित्या
कोणालाही विनामूल्य पाठवू
शकता.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :


www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १६ ऑगस्ट २०२१ (श्रावण द्वितीय सोमवार १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



# अल्प परिचय

मी मधुकर वि.सोनवणे. रेल्वेत ३६ वर्षे नोकरी करून १९९७ मध्ये नोव्हेंबरमध्ये कोंकण रेल्वेतून डेप्युटी चीफ इंजिनिअर म्हणून सेवानिवृत्त.

लहानपणी वयाचे आठव्या वर्षी ज्ञानेश्वरी जीवनात आली. करपात्री स्वामी, बाळकोबा भावे आदिंनी गीता व ज्ञानेश्वरी यांच्यात खोल जाण्याचा उपदेश केला.

पूर्ण ज्ञानेश्वरी १९७३ मध्ये वाचून झाली १९९१ मध्ये पहिले प्रवचन भुसावळ येथे दिले. नंतर आजवर ६०० च्या वर प्रवचने व जवळ जवळ तेवढेच विविध वृत्तपत्रातून लेखन झाले. ज्ञानेश्वरीचा अभ्यास करीत असतांना १६ व्या अध्यायात श्रुतींचा अभ्यास होणे हे भगवंताच्या गोचर होण्यासाठी आवश्यक सांगितल्याची ओवी वाचल्यावर उपनिषदांच्या अभ्यासाकडे ओढले गेलो.

उपनिषदांचे तत्वज्ञान हे ज्ञान-मार्गावर आधारित आहे. हे तत्वज्ञान जीवनाला कल्याणाचा मार्ग दाखविते.

विविध उपनिषदांचेवर भाष्ये वाचून त्यांचा आशय काव्यात उतरविण्याचा कार्यक्रम सुरु केला आहे.

‘ई साहित्य प्रतिष्ठान’ या प्रख्यात संस्थेने यांत रुचि दाखविल्याने जमेल तेवढ्या उपनिषदांच्या काव्यमय आशयाचे कार्य सुरु केले आहे.

गीता व ज्ञानेश्वरी यांच्यातील आशय आणि उपनिषदांचा अभ्यास करून त्यांचे काव्यमय आशयात्मक भाष्य याला याच प्रकारे प्रकाशित करण्याचे योजिले आहे.

आज दुसऱ्या श्रावण सोमवारी हे लेखन प्रकाशित होत आहे. आज पारशी नव वर्ष दिवस ही आहे. आपणा सर्वांस उर्वरित काल समाधानी जावो. शिव हे आदि गुरु आहेत त्यांना सादर वंदन.

आपणा सर्वांना या उपनिषदाने जीवनात ज्ञानाचा लाभ होवो व जीवन उज्वल होवो. हीच भगवंताला प्रार्थना

**अण्णा**

{मधुकर वि. सोनवणे}

१६/०८/२०२१

श्रावण शुद्ध अष्टमी द्वितीय श्रावणी सोमवार

# अर्पण पत्रिका



**कै न्या. राजाभाऊ ना. गवांदे**

**{११ मार्च १९२९ – मृत्यू १० मार्च २०१५ }**

**हे ईश उपनिषद काव्यमय भाष्य, माझे मावसभाऊ**
**कै. न्या. राजाभाऊ ना. गवांदे यांना अर्पण करीत आहे.**
**दादा, आपण ज्ञानेश्वरीची व अध्यात्माची गोडी लावली.**
**त्या गोडीने जीवन बहरून गेले आहे. आपल्या आशिर्वादांचे**
**फलित म्हणून मला हा अमृत कुंभ गंवसला.**
**हे ईशावास्योपनिषदाचे काव्यमय भाष्याचे लेखन आपणास**
**समर्पित करीत आहे. आपल्या आठवणी अजूनही टवटवीत**
**आहेत. आपल्या चिरंजीव अस्तित्वाला विनम्र कृतज्ञ वंदना.**

**मधु अण्णा**

**द्वितीय सोमवार –श्रावण शुद्ध नवमी, १६/०८/२१.**

# ईशावास्योपनिषद

## ग्रंथ परिचय

भारतीय संस्कृतीचा संपन्न वारसा टिकून आहे तो वेद आणि वेदांत यांच्यातील ज्ञानाच्या भांडारामुळे. हे अवघ्या १८ श्लोकांचे लहान उपनिषद अत्यंत मान्यवर झालेले आहे. ब्रह्मविद्या हाच यातील मुख्य विषय आहे.

कर्मत्याग करून स्वर्गाची अभिलाषा सोडून कर्म अत्याग करून आत्मनिष्ठ व्हावे हेच मुमुक्षूचे कर्तव्य आहे. हेच याचे सांगणे आहे.

ब्रह्मनिष्ठाने जगातील आपली विहित कार्येहि उत्तम पार पाडली पाहिजेत. अन्यथा मिळालेले जीवन व्यर्थ होऊन अधोगती होते. हा फार महत्वाचा विचार यांत दिला आहे. परहित करणे हा प्रत्येक मानवाचा जीवन हेतू असला पाहिजे आणि भौतिक सुखाच्या मागे लागून विद्वत्तेची प्रौढी मात्र बाह्यता:मिरवायची अशी दुटप्पी वागणूक घातक आहे, असे उपनिषद सांगते. याचे काव्यमय लेखन मुख्यत्वे स्वामी परमार्थानंद यांच्या इंग्रजी भाष्यावर आधारित आहे.” मी स्वामींचा कृतज्ञ आहे.

**अतिशय आशय गर्भ नि गहनहि, उपनिषदी लघु आकारी |**
**नामे ‘ईशावास्य’ ख्यात हे, अध्यात्मी उन्नती करी || १.**
**शुक्ल-यजुर्वेदाच्या माजी, वाजसनेही संहिता |**
**अध्यायहि तो चाळीसावा, अठरा मंत्री, पुरे होता || २.**
**विद्या ब्रह्माची प्रतिपादी, आत्मज्ञानहि त्या संगे |**
**श्रेष्ठचि तत्वज्ञान नि आशय, आपणाशी गुह्यचि सांगे || ३. ||**

हरी ॐ || – अणणा

# दिव्य आशीर्वाद



## शांतीमंत्र

*ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।*

*पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥*

*ॐ शांतिः शांतिः शांतिः॥*

**परब्रह्म हे परीपूर्णचि, जगतहि सकलचि पूर्ण असे |**

**पुर्णातुनीचि उद्भव त्याचा, पूर्णरूपे इहलोकी वसे || १.**

**पुर्णातुनी पूर्णास काढिता, पूर्णचि परिणामी उरते |**

**येथं काढणे नि उरणेहि, भ्रम दृष्टीने अनुभवी ते || २.**

**परमात्मा तो पूर्ण असीमचि, पूर्ण त्यातुनी जीवात्मा |**

**पुर्णातुनी ते पूर्ण काढिता, उरे पूर्णचि ना सीमा || ३.**

**परमात्मा-जीवात्मा एकचि, नाम रूपे ती भिन्न जरी |**

**तरंग उमटे सिंधुमधुनि, उभय जलचि ते एक तरी || ४.**

**येथं उमटणे दृष्टीचा भ्रम, एक दुज्यातुनी जे निघणे |**

**एकचि असुनी, दोन वाटणे, ऐशा द्वैता अनुभवणे || ५.**

**समष्टी सागर, व्यष्टी तरंगचि, रूप-नाम-उपाधीची |**

**उभय एक ते दोन भासणे, किमया ही तर मायेची || ६.**

उपाधीमधुनि निज-स्वरूप काढिता, नाम-रूपे सहजी विरती |

नव्हते ते मिळताचि तेथे, मिटते केवळ ती भ्रांती || ७.

आभास मिटता, हानी लाभ ना, सत्यातुनी मिथ्या गेले |

मायेचा बाजार संपला, स्वप्नचि ते पुरते निमले || ८.

कारण ब्रह्मातुनी उद्धवे, कार्य ब्रह्म ते संसारी |

पुर्णत्वाला नसेच बाधा, शेष ब्रह्मचि उरे परी || ९.

कारण तो भगवंत असेचि, मी कार्येचि उद्धवलो |

कार्य संपता, पुन्हा समरसे, मिथ्या गेलो नि आलो || १०.

ब्रह्म सत्य नि मिथ्या जग हे, हे न कदापि विसरावे |

खेळ खेळणे व्यवहारी तो, विरक्तीस ना सोडावे || ११.

त्रिविध ताप ते पूर्ण शांत हो, शांती विचलित ना होवो |

पूर्ण विश्व व्यवहार चालता, शांती भंग न ती पावो || १२.

ॐ शांति: शांति: शांती: ||

## || ॐ ईशावास्योपनिषद प्रारंभ ||

*ॐ ईशा वास्यमिदँ सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत् ।*

*तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्यस्विद्धनम् ॥ १ ॥*

**अस्तित्वी जे जे या जगती, ईश-तत्वाने आच्छदिले |**

**नाम-रूपे ती विविध तरीही, एका चैतन्येचि चळे || १.**

**पांच भूतांच्या विविध मिश्रणे, विविधचि नाम-रूपे दिसती |**

**चैतन्याच्या स्पर्शे सारी, हालचाल करिती जगती || २.**

**परि सारी हि एक ब्रह्मचि कार्य वेगळे जरी असे |**

**ईश- तत्व ते एकचि सकली, विविधता ती जरि भासे || ३.**

**वेगवेगळ्या कार्यासाठी, देहधारी जे या जगती |**

**प्रारब्धाने स्थिती वेगळी, कुणी मदतीस्तव ते बघती || ४.**

**त्यांच्या गरजा भागवुनिया, जेही शेष असे उरले |**

**उचित तयाच्या भोगा घेई, हेचि जीवनी असे भले || ५.**

**तैसेची जग-कार्यासाठी, जे तुज प्रभुने योजियले |**

**तये त्यागिले ते तुजसाठी, तया स्वीकारी, हेची भले || ६.**

धन वा साधन ईश्वर पुरवी, विश्वकार्य करण्यासाठी |
नको परधनी तुज आसक्ती, गिधाडवृत्ती न त्यासाठी || ७.

जयावरी स्वामित्व दुज्याचे, नको तयाची अभिलाषा |
दैवे लाभे तेचि स्वीकारी, धरी अन्याची, नच मनीषा || ८.

स्वभावेचि तंव वाट्या आले, तया विवेके विनियोगी |
सर्वव्यापी तो ईश्वर पाही, सर्वचि त्याचे असे जगी || ९.

सारे कांही भगवंताचे, माझे येथे कांही नसे |
साधन त्याने दिधले मजला, त्याच्या कार्या करीतसे || १०.

त्याचे कार्यास्तव मी आलो, साधन कार्यास्तव घेई |
कार्य तोवरी साधन हाती, येथ न माझे ते कांही || ११.

जे-जे लाभे या इहलोकी, कार्यास्तवचि जाणावे |
माझे इथले नसेची कांही, नित्यचि ध्यानी ठेवावे || १२.

जरि प्रेमाने भगवंताने, साधन भोगास्तव दिधले |
कृतज्ञ होऊनि सेवन करणे, ममत्व त्याचे नसे भले || १३.

पालन कर्तव्याचे करिता, त्याग भावना सदा असो |
परहित हीचि ईश्वर सेवा, विषय कर्दमी, रुचि नसो || १४.

अगा जयाला जेहि विहितचि, तेचि मनोगत श्रीहरीचे |
त्यासि करिता नसेचि भ्रांति, जीवन जाई सौख्याचे || १५.
देहे इथले कार्य कराया, विषयी तो आनंद दिला |
आनंद कार्या करिता घ्यावा, नच तो कि उपभोगाला || १६.
वाट्या आले जेही भोग हे, स्वामींची ही कृपा असे |
कुणा भोगीहि नच आसक्ती, कार्यास्तव हे लाभतसे || १७.
विषयांतील आनंद भोगण्या, प्रयास कुणीही ते करणे |
हे तर स्वामींच्या अधिकारी, अधिक्षेपचि तो होणे || १८.
जितुके आणि जिथवर भोगा, भगवंताने योजियले |
तेवढेची त्या सेवन करणे, हांव न अधिकाची धरणे || १९.
विषयभोग जे दिसती जगती, नको तयांची आसक्ती |
सकला स्वामी एकचि ईश्वर, देईल ते करि सुखप्राप्ती || २०..
ज्या कार्यास्तव आला जगती, त्यास्तव साधन तो देई |
कृतज्ञ भावे जेही लाभते, विनम्र होऊनि ते घेई || २१.

*कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतँ समाः ।*

*एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ॥२॥*

परमात्मा असता जीवात्मा, होऊनि इहलोकी आला |

या विश्वातील तुला नेमिले, विशिष्ट कार्या करण्याला || २२.

प्रत्येकाचे कार्य वेगळे, तशीच क्षमता तया मिळे |

साधन आणी उचित सहाय्यहि, ईश्वर योजितसे सगळे || २३.

विहित कार्य जे ये वाट्याला, श्रद्धेने ते करी जगती |

करुनी निष्कामे कार्यासी, अर्पण करी ती प्रभुप्रती || २४.

प्रति क्षण ऐसा योजुनि कार्या, सफल करी आयुष्याला |

ऐशी शत वर्षाची कामना, कृतार्थ करि नर-जन्माला || २५.

सारी कर्मे त्याचेसाठी, सेवा हे पूजन त्याचे |

स्वकर्म कुसुमे त्या आवडती, बंधन नच मग कर्माचे || २६.

गरजवंत जो कुणीही दिसता, यथाशक्ती दे मदतीला |

नको तयाचा कुठे गवगवा, हेची आवडे देवाला || २७.

विवेक आणि अनासक्तीने, बंधन ते कसलेही नसे |

त्याग भावना सदा मानसी, नित्य मुक्त जीवनी असे || २८.

श्रेष्ठ एकचि मार्ग असे हा, स्वधर्म यज्ञा ना सोडी |
हेची ईश्वर पूजन उत्तम, त्यांतचि नित्य असो आवडी || २९.

प्रवृत्ती मार्गा कथियले, दोनचि श्लोकी या श्रुतीने |
श्लोक आठ पर्यंती आता, निवृत्तीपथ दाविला तिने || ३०.

पूर्ण ज्ञान निवृत्ती मार्गी, महत्व त्याचे वर्णियले |
ज्ञान,कर्म नि उपासनाही, प्रवृत्ती मार्गी आले || ३१.

*असुर्या नाम ते लोका अन्धेन तमसाऽऽवृताः ।*

*ताँस्ते प्रेत्याभिगच्छन्ति ये के चात्महनो जनाः ॥३॥*

**ज्ञानचि देई ते मुक्तीला, पुरुषसुक्ती त्या श्लोक असे |**

**अन्य मार्ग तिज नसेचि दुसरा, श्रुतिही हेची सांगतसे || ३२.**

**उपासना नि कर्मे केवळ, प्रसिद्ध जगती ते करिती |**

**जनास वाटे थोर महात्मा, परि ज्ञानाविण ना मुक्ती || ३३**

**उपासना नि व्रते थोर ती, अडकविती पुरते द्वैती |**

**जन्म आपुला नच यासाठी, परि होणे ब्रह्म-प्राप्ती || ३४.**

**द्वैताने भगवंत दुरावे, हृदयी जाणीवरुपी वसे |**

**द्वैती अनुभवी अद्वैताशी, अद्वैती भगवंत असे || ३५.**

**गीतेत ईश्वर स्वयेचि सांगे, हृदयी मी जाणीव बनुनी |**

**स्व-संवेद्यचि स्वरूपी असता, मिळेल कैसा शोधोनी? || ३६.**

**द्वैती अडकता, अंती गती ती, असुरलोकांची होई |**

**अंधाराचा मार्ग असे हा, नरजन्महि व्यर्थचि जाई || ३७.**

**आत्मबोध एकले ज्ञेय ते, विवेक वैराग्ये जाता |**

**संग येथले ते सोडावे, नित्यचि धरणे अद्वैता || ३८.**

ज्ञानमार्ग हा सर्वश्रेष्ठचि, वासुदेव सकली पाही |
उपाधीला ना लिप्त कदापि, चैतन्यात सदा राही || ३९.

निज-रुपाला नित आठवावे, कर्में सारी जरी करी |
स्वधर्म-यज्ञा ना सोडावे, अलिप्य राहुनि व्यवहारी || ४०.

ब्रह्मचि आपण, आलो जगती, विशिष्ट कार्या साधाया |
अलिप्त राहुनी कार्य करावे, ध्यानी ठेवी ही माया || ४१.

दुर्लभ नर देहाची प्राप्ती, ईशकृपेविण ना जगती |
देहचि साधन परहितास्तव, टाळुनी होई अधोगती || ४२

जे अज्ञाने विषया भुलले, विषयानंदी त्यास प्रीति |
भोग-पारायण असूरचि ते, नसे कदाही निवृत्ती ||४३.

भोगी आसक्ती तया वाटते, जन्मचि भोगास्तव आपुला |
ऐशा भोगा पशुही भोगिती, नेती निश्चित अवनतीला || ४४.

जे चटावती विषय भोगी ते, दुखावतीचि आत्म्याला |
पतनाचाचि मार्ग असे हा, निश्चित जाती नरकाला || ४५.

भौतिक सुखी जे, असे गुंतले, मिळे मान-धन नि कीर्ति |
असुरी वैभवी तुष्टी तया जरि, अवनती ती होई अंती || ४६.

गीता सांगे या नरदेही, उद्धारी आपणा स्वये |

विवेक जागृत नित्य ठेविता, कदा न अवनती होत तये || ४७..

*अनेजदेकं मनसो जवीयो नैनद्देवा आप्नुवन्पूर्वमर्षत् ।*

*तद्धावतोऽन्यानत्येति तिष्ठत्तस्मिन्नपो मातरिश्वा दधाति ॥ ४ ॥*

**तो सकलांचा अंतर्यामी, सकल शक्तींचा भांडारी |**

**तो परमात्मा निश्चल राहुनि, गतीमान सकलाशी करी || ४८.**

**गतिमान ना कुणी त्याहुनि, मन, बुद्धी वा वायू जरी |**

**देव, इंद्रिये मंद त्यापुढे, अतुल्य गति ना त्याजपरी || ४९.**

**सर्वव्यापी तो तया न अंतर, कुणा आधीही असेच तो |**

**त्याचमुळे तो विना धावता, कवणाही स्थळी क्षणी येतो || ५०.**

**गति, जल-वर्षा, प्रकाशनहि वा, कर्म नि ज्ञानास्तव शक्ती |**

**अन्य क्रियांच्या सकलही शक्ती, एका अंशातुनी सृजिती || ५१.**

**प्रदान करिता सकला शक्ती, नच भांडारी उणीव ती |**

**ब्रह्मांडांच्या असीम शक्ति, पूर्णपणे त्यांतचि वसती || ५२.**

**अस्तित्वेचि भगवंताच्या, शक्ती पर्याप्तचि मिळे |**

**तेथे नाही देणे घेणे, अस्तित्वे ब्रह्मांड चळे || ५३.**

**गतिमान ते सकल चराचर, अणुरेणु हि नसे रिता |**

**जे ते आपुल्याचि उद्योगी, दुज्याशी बाधा ना येता || ५४.**

देह अनेकचि जाणीव एकचि, सकला व्यापुनिया राही |

ब्रह्म असे ते सर्वगतचि नि, कुणी न तयाला जाणेही || ५५.

जीवात्मा हे नाम वेगळे, जगती प्रपंच व्यवहारा |

अभिन्न तो परि परमात्म्याहुनीही, खेळ खेळवी तो सारा || ५६.

*तदेजति तन्नैजति तद्दूरे तद्वन्तिके ।*

*तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यतः ॥ ५ ॥*

**विना चालता चाले ईश्वर, निश्चल असता, तया गती |**

**सकला चालवितो परमात्मा, निश्चल असुनी गती जगती || ५७.**

**भक्ताने आवाहन करिता, साह्य पूर्णचि तया करी |**

**जगात कोठेही त्या स्मरता, तया न अंतर वा दूरी || ५८.**

**द्वैते अन्यचि तया मानिता, अती दूरचि तो वाटे |**

**हृदय मंदिरी परि भक्तांच्या, स्मरता तत्क्षणीच प्रगटे || ५९.**

**आत्मा नामक नसेचि वस्तू, इंद्रियाशी ती ना गंवसे |**

**देहबुद्धी टाकिता तोचि मी, मीचि मज शोधू कैसे ?|| ६०.**

**भक्त न शोधी भगवंताला, सकली वासुदेव पाही |**

**अशी न जागा या संसारी, तेथं वासुदेव नाही || ६१.**

**शिव-ज्योती लिंगा पाही निजांगी, देहबुद्धीला ते त्यागी |**

**मीच शिव ही दृढची भावना, उमा चेतना अर्धांगी || ६२.**

**सकल जगा आधार एक तो, परमचि कारण विश्वाचे |**

**इच्छामात्रे चाळावी विश्वा, नियमन पूर्णचि नित त्याचे || ६३.**

*यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति ।*

*सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते ॥ ६ ॥*

**भगवंतांचे ठायी ज्याशी, सकल चराचर पूर्ण दिसे |**

**आणि चराचरी, जेथं पाही तो, भगवंताविण कांही नसे || ६४.**

**सर्वव्यापी तो आत्मदेवचि सबाह्याभ्यंतरीं दाटे |**

**तो नाही ऐसा ना कणहि, शोधण्याशी जाणे न कुठे || ६५.**

**दिसते सारे आत्मरूपची, वेगळेपणा नच कांही |**

**जळामाजी ते जळचि खेळे, वृथा दुजेपण कां पाही? || ६६.**

**अद्वैताची अशी अनुभूति, मी-तूं पण पुरते मिटवी |**

**सारे सारे एकचि असता, मीचि विनटलो या विश्वी || ६७.**

**हेचि कैवल्योपनिषदिही श्रुति सांगते आपणाला |**

**सारी निर्मिती स्थिति नि लयहि, मीचि असे कारण याला || ६८.**

**अलंकार जरि दिसती वेगळे, रूप-नाम वेगळे असे |**

**फरक असे हा वरवरलाचि, सुवर्णाविना अन्य नसे || ६९.**

**अशी हरीमय दृष्टी ज्याची, प्रेमभावना सकलाशी |**

**नसे असूया, क्रोध द्वेष वा, मत्सर ऐसा कोणाशी || ७०.**

जो संपर्की येत तयाच्या, आनंद हरीच्या भेटीचा |
सेवा परहित पूजन त्याचे, नसे भाव उपकाराचा || ७१.

सारे-सारे प्रियचि त्याला, अप्रिय कुणीही ना जगती |
नित्यचि पुढती हरी पाहता, करी वंदन तो तयाप्रती || ७२.

जागृति-स्वप्नी हरीस पाही, हरिविण अन्य न अनुभूती |
मनोमनी तो नमितो सकला, दिसेच हरि त्या नित पुढती || ७३.

अशी जागृती येता निर्भय, आणि मुक्त तो व्यवहारी |
तरंग म्हणुनि नसे अलगता, जलचि आंत नि बाहेरी || ७४.

तरंगास ते होणे जाणे, जीवात्मा होई जाई |
जळा जैशी ती चिरंजीविता, परमात्मा शाश्वत राही || ७५.

*यस्मिन्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः ।*

*तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः ॥ ७ ॥*

**भाग्यवंत तो, भगवद्दृष्टी, दैवे लाभे ती ज्याशी |**

**भवकर्मे तो करितो सारी, ऐसे दिसते जगताशी || ७६.**

**परि करणे ते सारे त्याचे, जणु क्रीडा भगवंताशी |**

**बोले खेळे रुसे नि भांडे, हंसता हंसता तो हरीशी || ७७.**

**जैसे जनाबाईशी नित्यचि, मदतीस सकली कार्याला |**

**तैसे ज्ञात्याच्याहि संगे, स्वये हरीची मदतीला || ७८.**

**आत्मानंदी जोही रंगला, मोह-शोक नसती त्याशी |**

**स्वये हरीशी समरसला त्या, उणीव सौख्याची कैशी || ७९.**

**नित्यचि आनंदात असे तो, संग हरीचा नित्य घडे |**

**सेवाभावी आनंद त्याला, करि ते, जे हरीला आवडे || ८०.**

**एकचि एक जगती असता, प्रश्न न मोह नि क्रोधाचा |**

**नुरती कामना, खेळ संपला, आशा आणि निराशेचा || ८१.**

*स पर्यगाच्छुक्रमकायमव्रणं अस्नाविरँ शुद्धमपापविद्धम् ।*

*कविर्मनीषी परिभूः स्वयम्भूर्याथातथ्यतोऽर्थान्*

*व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ॥ ८ ॥*

**तो परमात्मा कर्मानुरूपचि, जीवन काला योजितसे |**

**अनुरुप देह नि व्यक्ति, साधने यांची रचना करीतसे || ८२.**

**जया लाभले स्थान अद्वैती, तेजस्वी तो शुद्ध सदा |**

**देह तयाचा केवळ साधन, उणीव नाही आनंदा || ८३.**

**प्रसंग, नाती, व्याधी भोगही, ईश्वर योजी उचित काली |**

**कर्मानुरूपचि जीवन आंखणी, लिहितो तो आपुले भाळी || ८४.**

**कुणी कुणाला आणि कैसे, भेटुनिया जीवन बदले |**

**त्या-त्या वेळी प्रसंग घडती, जैसे त्याने आखियले || ८५.**

**आपुले प्रारब्ध न घडते ते, कुणा दुज्याच्या कर्माने |**

**पेरिलेचि जे  पूर्वी क्षेत्री, तेचि उगवे बहराने || ८६.**

**जगताच्या या मायाबाजारी, सारे आहे मिथ्याची |**

**नको अपेक्षा शांती सुखाची, जाणीव ठेवावी याची || ८७.**

भौतिक जेही पदार्थ सारे, नाशवंत सारे विरती |
कैसे देतील शांती सुरक्षा, अस्तित्वचि त्यांचे भ्रांती || ८८.

म्हणुनि जगती या नच गुंतावे, वृथा अपेक्षा फोलाची |
नर-जन्माचे सार्थक होण्या, ओढ ती केवळ बोधाची || ८९.

बोध जयाला यथार्थ झाला, समरस होई ब्रह्माशी |
सर्वव्यापी नि निर्गुण आत्मा, प्रेमची ज्याचे सकलाशी || ९०.

तोचि नियंता या विश्वाचा, सुसूत्रता आणी जगती |
योग्य वेळी तो योग्यचि घडवी, घेऊनी मायेला हाती || ९१.

तो लीलाधर पुरता न्यायी, भगवद्दृष्टी जया प्रति |
त्याशी समरशी आपणामाजी, देई दिव्य देह प्राप्ती || ९२..

भक्त आणि भगवंत भेद ना, भक्तचि होई भगवंत |
पार्थिवतेच्या मिटती चिंता, वृत्ती नित्य आनंदात || ९३

*अन्धं तमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते ।*

*ततो भूय इव ते तमो य उ विद्यायाँ रताः ॥९॥*

**अज्ञानी जन देह्बुद्धिरत, सत्य मानिती संसारा |**

**इथले सारे सत्य तयाला, आसक्ती त्या व्यवहारा || ९४.**

**जीवनपथ तो अज्ञानाचा, अनुसरती ते अंधारा |**

**विवेक दीपावरी काजळी, प्रकाशास तो ना थारा || ९५.**

**ऐसे अज्ञानी ते अंती, प्रवेशतीची अंधारी |**

**परि जाणते शास्त्र नि वेदा, विद्या मुखोद्गत सारी || ९६.**

**परि जेही ते तये जाणले, ती नुसती पोपटपंची |**

**आसक्ती पुरती संसारी, ओढ तुटे ना विषयांची || ९७.**

**दिसती आश्रम ते जगताला, रत भोगातची परि झाला |**

**शिष्य फसविती ते भाडोत्री, नीच पशुहुनी तो बनला || ९८**

**भगवी वस्त्रे, गळ्यात माळा, कामातुर विषयी रमला |**

**विवेक वैराग्या न अनुसरी, भव-चक्रातची सांपडला || ९९.**

**त्रिविध ताप पोळिती तयाला, हिणकस जीवन व्यतीत करी |**

**ठेचाळत आपदात चाले, वाट तयाची अंधारी || १००.**

जगा भासती विद्वानची ते, अभिमानी परि ज्ञानाचे |
आणि स्वार्थ तो कधी सुटेना, पूर्ण भान व्यवहाराचे || १०१.

जाणती ज्ञाना, परी अज्ञानी, ‘अंतस्त्यागी, बहि:संगी’ |
आसक्ती पुरती संसारी, विषयानंदी ते रंगी || १०२.

ऐसे पोपट विवेक टाळुनी, जाती महान अंधारी |
कारण ज्ञान न देखावाची, आचरणी जंव ना उतरी || १०३.

शास्त्रे सांगती पांच यज्ञ ते, सकलांनीही आचरणे |
देव यज्ञ तो, ईश्वर चरणी, कृतज्ञ नित त्याशी स्मरणे || १०४.

पितृयज्ञी ती जेष्ठा सेवा, मृत होता ती दान-स्मृती |
मनुष्य-यज्ञी, परहित करणे, दुर्बलास देणे शक्ती || १०५

भूतयज्ञी ते सकलचि सजीवा, यथामती साह्या करणे |
ब्रह्मयज्ञी तो कृतज्ञ आदर, ऋषि मुनींच्या त्या स्मरणे || १०६.

पांचाही या महान यज्ञे, यथामती जैशी शक्ती |
आचरता ती जळती पापे, लाभे जीवनात शांती || १०७.

जे आचरती अनासक्तीने, विना कामना कांही मनी |
ज्ञान नि मोक्षा सहजी पावती, धन्यचि होती ते जीवनी || १०८.

भौतिक लाभास्तव जे यज्ञा, स्वार्थचि भावे अनुसरती |

जरी लाभती सुखे ती भौतिक, सात्विक सुख ते ना अंती || १०९.

उद्धारास्तव मानव जन्मचि, इहलोकी ते कां रमणे ? |

खोट्या क्षणिकचि लाभे जीवन, काळोखातचि ते नेणे || ११०.

भवचक्राचे चुकती न फेरे, कल्पनेतल्या सुखी रमणे |

धिक्कारचि त्या अस्तित्वाचा, टाळतसे शाश्वत जेणे || १११.

उपासना ती सकाम असता, ब्रह्मलोकी येणे जाणे |

जन्म-मरण नि सुख-दुःखाच्या, पुन्हाचि अनुभूती त्या घेणे||११२.

दुर्लभ मानव जन्म लाभला, कल्पनेतल्या सुखी वृथा |

दिव्य लाभ तो सोडुनि देऊनी, जवळी करणे त्या मिथ्या || ११३.

बालपणी खेळण्यात रमणे, यौवनात नि ते विषयी |

वार्धक्यी त्या जर्जर देही, जीवन संपुनिया जाई || ११४.

असले जीवन पशुहि भोगती, मानव जन्मी वृथा आला |

दिव्य लाभ तो सुलभचि असता, सारा जन्म वृथा गेला || ११५.

*अन्यदेवाहुर्विद्ययाऽन्यदाहुरविद्यया।*

*इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥ १० ॥*

प्रज्ञावंतचि असे महात्मे, सुयोग्य ऐसे ज्ञान दिले |

सद्भाग्ये ते आम्हालागी, यथार्थचि बोधा कथिले || ११६.

सर्वोत्तमचि त्या फल प्राप्तीस्तव, यथार्थ ज्ञान-स्वरूपाशी |

नित्यानित्यविवेक जाणणे, इह-पर लोकी भोगाशी || ११७.

नित्य जीवनी अनासक्त नि, प्रपंच द्वैती ना रमणे |

संयमी आणि पावन जीवन, पर-ब्रह्मी चिंतन करणे || ११८.

ज्ञानी परंतु, ना अभिमानी, अलिप्त राहुनी करी कार्ये |

सारे करी परि कदा न गुंते, दुर्गुण वृत्तीही जात लये || ११९.

निष्कामचि तो, सदैव कर्मी, फल आशा ना कदा मनी |

एक हरीविण दुजे नको त्या, दिव्यत्वाचा तोचि धनी || १२०.

अद्वैताशी नित अनुभवणे, निजबोधा जाणुनी घेणे |

दिव्यचि फल ते तये लाभते, ना कि कदाही ते अन्ये || १२१

जेणे भवसागर सहजी तो, तरुनी निजरुप अनुभवणे |

तरीच सार्थक नरदेहाचे, शाश्वत शांतीसुख ती जेणे || १२२.

अंती लाभे शुक्ल गती त्या, संपती इह-पर लोकी फेरे |

सकाम कर्मे, भौतिक सुखची, जे की नाशवंत सारे || १२३.

*विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयँ सह ।*

*अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ॥११॥*

**अविद्या नि विद्येस जाणतो, जोही ज्ञाता पूर्णपणे |**

**स्वधर्म पालन करी निष्कामे, अमृतप्राप्ती ती तेणे || १२४.**

**विद्या जाणे पांची यज्ञे, निष्कामे कर्मे करणे |**

**कदा न गुंते द्वैतामाजी, नर-जन्म ना वाया जाणे || १२५.**

**निद्रा संपुनी जागृत होता, शिव अनुभवणे अंतरीचा |**

**स्व-संवेद्य ऐशी जाणीव हृदयी, अनुभव तो अस्तिवाचा || १२६.**

**अस्तित्वा या हरीने दिधले, सारी कर्मेही त्यासाठी |**

**उचीत कृतीने मंगल व्हावे, प्रार्थावा तो जगजेठी || १२७.**

**जे-जे हि व्यवहार चालती, लक्ष त्यावरी ठेवावे |**

**द्वैतामाजी देह वावरे, निजरुपी आपण रंगावे || १२८.**

**उपासना ही, कधि न सोडणे, हेची ब्रह्म स्वये होणे |**

**विश्वरूप तैसे या जगता, हरिमयचि ते अनुभवणे || १२९.**

**निजरुपाची नित्यचि जाणीव, विद्या तिजलागी म्हणती |**

**सकाम कर्मा प्रवृत्तीची, तीच अविद्या अधोगती || १३०.**

जोही अनुभव-प्रसंग येई, सहजी अंगीकार त्याचा |
मीचि कर्ता तसेचि भोक्ता, खेळ असे हा श्रीहरीचा || १३१.
कठीण विपरित येता स्थिती ती, अवश्य हरीला प्रार्थियणे |
अंतरीचा शिव त्याशी समर्पण, प्रसाद तो त्याने देणे || १३२
लक्ष असावे अंतरी पुरते, विचलित मन कितीदा  होई ?|
किती खोल ती जाणीव जाते, पुन्हा स्थिरता मनी येई || १३३.
या स्वाध्याये समजे आपुला, भाव समर्पण किती मुरला?|
तसे वाढवी लक्ष ठेऊनी, श्रद्धा नि  विश्वासाला || १३४.
प्रसन्नता शांती नि आत्मबल कदाहि विचलित ना व्हावे |
खेळ म्हणोनी सारे बघता, सारे त्याला अर्पावे || १३५.
विपदा सांगे विसर हरीचा, विचलित श्रद्धा त्यावरची |
तोचि खेळे हे विसरोनी, देह-भावना जागृतीची || १३६.
नमस्कार तो भगवंताला, करिता स्वार्थ मनात असे |
व्हावे माझ्या मनासारखे, भाव असा निष्काम नसे || १३७.
हीच अविद्या समूळ जाण्या कृती आपली जाणावी |
विवेक दीपे, साक्षी भावे, सकल कामना सोडावी || १३८.

स्वार्थ भाव नि अहंकारहि, पुरता सोडुनिया द्यावा |
हेच जाणणे विद्येलागी, मनी खरा सद्भाव हवा || १३९.

करुनी कर्मे ना कर्तेपण, फल-हेतूही सोडावा |
कर्म अकर्मचि होत तेधवा, करुनी न करणे या भावा || १४०.

व्यवहाराशी नाही सोडणे, द्वैत अलीप्ते आचरणे |
अविद्येसी त्या पूर्ण जाणुनि, मोहापासुनी ते जपणे || १४१.

अविद्येतुनी विद्येमाजी, चित्ती श्रीहरी नित पाही |
निष्कामे निष्ठेने कार्ये, परि गुंतणे ते नाही || १४२.

ऐशा योगे, मृत्यू लंघिता, सहजी चिरंजीव होई |
स्वये ब्रह्मचि शाश्वत होऊनी, अद्वैती अनुभूती घेई || १४३.

यासाठी ना ध्यान-धारणा, जप-तप तीर्थाशी जाणे |
यथार्थ जाणुनि परब्रह्माला, सुख-शांती ती अनुभवणे || १४४.

विवेक आणि विरक्ती हेचि, दोन पंख ते ज्ञानाचे |
तेणे शून्यी घेई झेप तूं, तरीच सार्थक जन्माचे || १४५.

*अन्धं तमः प्रविशन्ति येऽसम्भूतिमुपासते ।*

*ततो भूय इव ते तमो य उ सम्भूत्याँ रताः ॥१२॥*

द्वैत प्रपंची अडकुनी पुरते, माझे-माझे जे म्हणती |
इह-लाभास्तव धावती वेगे, मिळण्या धन, मान नि कीर्ति || १४६.

उपासना जी सकाम तिजशी, असंभूती शास्त्रे म्हणती |
इहलोकाच्या भोगी गुंतणे, इथलीच जेथे आसक्ती || १४७.

स्त्री,पुत्र नि स्नेही सोबती, यांतचि गुरफटुनिया जाती |
वेळ काढुनि दैवत-पूजन, तीर्थे क्षेत्रे जे फिरती || १४८.

शोधिती द्वैती, भगवंताला, प्रवचन,पारायण करिती |
भजने स्तोत्रे गाऊनी नाचुनी, देवाला ते आळविती || १४९.

ते तर द्वैतालाची भुलले, आवडी बहु ती लक्ष्मीची |
प्रपंच सोडुनि शेष उरे ती, शय्या नारायण याची || १५०.

ज्या मातीतुनी देह निर्मिला, ज्ञानाग्नीने भाजुनिया |
टणक वीट ती करिता तिजने, देह-भाव तो जात लया || १५१.

पांडुरंग त्यावरी विराजे, देहातीतचि विटेवरी |
करुनी सारे नाही गुंतणे, दाविण्यास कर कटेवरी || १५२.

अविद्येस लंघिता ती विद्या, तोची निर्गुण भगवंत |
नित्यचि अद्वैती तो राही, त्याशी शोधी ना दैतात || १५३.

गीतेत अर्जुनास हरि सांगे, स्मरणी ठेवावे मजला |
आणि कर्तव्याशी करणे, नको टाळू तूं युद्धाला || १५४.

व्यक्तातची ते नित्य गुंतणे, स्वधर्म विसरुनिया जाणे |
यासाठी ना जन्म असे हा, स्वधर्मपालन नित करणे || १५५.

ज्यांची केवळ भौतिक प्रगती, जीवनात तीचि आपुल्या |
व्यर्थचि जीवन जरि न सोडवी, समस्याही त्या इतरांच्या || १५६.

केवळ स्वार्थामागे लागून, समष्टीला ते दुर्लक्षिणे |
हे वाईट परि तयाहुनीही, त्यातची गुंतुनिया जाणे || १५७.

कांहीजण मूर्तीत गुंतती, संसारी दुर्लक्ष करी |
हेही चूकचि स्वधर्मपालन, कर्तव्याला ना विसरी || १५८.

गीतेत सांगे श्रीहरी पार्था, नित्यचि ईश्वर हृदयात |
स्व-संवेद्य जाणीव तोचि ईश्वर, कशी अनुभूती द्वैतात ?|| १५९.

अनुभवी हृदयीचा नारायण, परब्रह्म साक्षात जिथे |
प्रसन्न असता नारायण तो, स्वये लक्ष्मी येत तिथे || १६०.

भजन-पूजनी जेही रंगले, प्रथम पायरीशी आले |
चित्त-शुद्धी नि शुद्ध आचरण, हेची साध्य तये झाले || १६१ .

सगुण असे ही पहिली पायरी, मात्रा तीन ॐकाराच्या |
चवथ्या पादा अमात्र तुर्या, ती तर पैलची द्वैताच्या || १६२.

म्हणुनि पायरी उल्लंघुनी ती, अनुभवणे अद्वैताशी |
पहिली पायरी नसे ज्ञेय ते, वृथा रंगणे द्वाराशी || १६३.

जगती द्वैताशी न सोडिती, प्रकाश अनुभूत ना होई |
नुसते ज्ञान नसे उपयोगी, अनुभूती शब्दी नच येई || १६४.

द्वैतामाजी ना गुंतावे, पुरते नच ते सोडावे |
तोल द्वैत-अद्वैताचा राहील, ऐसे जीवनी साधावे || १६५.

द्वैती मुक्ती कदा मिळेना, चालू भव-चक्रची राही |
अज्ञानाची रात्र न संपे, मार्ग प्रकाशाचा नाही || १६६.

द्वैता पुरते दुर्लक्षहि ते, श्रुति सांगे ना योग्य असे |
स्वामी कार्य नि स्व-कार्यहि ते, दोन्ही साधणे उत्तमसे || १६७.

शिवाचेचि संगे ती शक्ति, शिव नच कधिही शक्तीविणा |
अर्धनारीनटेश्वर एकचि, समर्थ ना ते दुज्याविणा || १६८.

**जैशी शिवाची, तशी शक्तीची, उपासना ती नित करणे |**

**ब्रह्मीनिष्ठा-परहित साधन, उचितचि उभया आचरणे || १६९.**

*अन्यदेवाहुः सम्भवात् अन्यदाहुरसम्भवात् ।*

*इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥ १३ ॥*

*सम्भूतिं च विनाशं च यस्तद्वेदोभयँ सह ।*

*विनाशेन मृत्युं तीर्त्वा सम्भूत्याऽमृतमश्नुते ॥१४॥*

**व्यक्त आणि अव्यक्त शक्ती त्या, अस्तित्वाशी सावरती |**

**साधन सक्षम एकाद्वारे, दुजीने अंतरीची प्रगती || १७०.**

**सर्वांचा हरी आश्रयदाता, सर्व शक्तीचे आगर तो |**

**ज्ञानरुचीला पाहुनिया तो सहाय्यास तैसे करितो || १७१.**

**देह असावा सदैव सक्षम, तोचि साधन या जगती |**

**त्यास्तव त्याचे भरण नि पोषण, तसेची संबंधहि जपती || १७२.**

**देह करीतसे प्रपंच-कार्ये, ज्ञानार्जनहि संगतीला |**

**काल-प्रवाही अनुभुती त्या, घडविती निजव्यक्तित्वाला || १७३.**

**विवेक वेळीच जागृत करुनी, श्रेयस-प्रेयस जाणावे |**

**भौतिक-अध्यात्मिकही घडविती, विनम्रतेने सेवावे || १७४.**

**जनक-जननी नि गुरु-अध्यापक, यांसी उतराई व्हावे |**

**स्नेहीजन नि महान शास्त्रे, कृतज्ञता आदर भावे || १७५.**

आपत्काली, व्याधीकाली, विपरितही त्या-त्या काला |

व्यक्ता सावरलेचि म्हणुनि, जाणियाले अव्यक्ताला || १७६.

व्यक्त प्रपंची यथाशक्ती ते, सहाय्य गरजूंना करणे |

कुणी संकटी असता त्यांना, शक्य जेही ते सावरणे || १७७.

परी नित्यची ध्यानी असावे, भान न सोडी ज्ञेयाचे |

स्वधर्मपालन नि ज्ञानार्जन, महत्व जीवनी उभयांचे || १७८.

व्यवहारी या जगतामाजी, सहाय्याशी जेही येती |

कृतज्ञचि राहुनिया त्याशी, पूज्यभाव तो तयाप्रती || १७९.

कैवल्याच्या मार्गावरती, ज्यांनी सहाय्य ते केले |

भाष्यकार नि लेखक कविवर, संत-ईश्वरे सावरिले || १८०.

अन्य असती जे सान-थोरहि पूज्य देवता या सकला |

अज्ञानी जे द्वैती जेही, उचीत ऐशा समयाला || १८१.

हळूहळू न्यावे अद्वैती, निष्कामे सत्पंथाला |

चित्त शुद्धी नि परहित साधन, महत्व सांगावे सकला || १८२.

भरण-पोषणासवे सत्संगे, अंतर्मुखता साधावी |

श्रवण मनन नि निदिध्यासने, अंतरात शांती यावी || १८३.

ईश्वरास हे जगतहि हवे, क्रीडेस्तव निर्मिती असे |

येणे विहित कार्ये करिता, अहंभाव तो मनी नसे || १८४.

तोल आणि तालही साधणे, लौकिक नि अध्यात्माचा |

जया साधला, तया उमगला, खरा अर्थ आयुष्याचा || १८५.

साधुनिया व्यवहार जगतीचे, विहित कार्या ना सोडी |

वाट्या आल्या भोगा भोगी, आसक्तीत परि परि ना गोडी ||१८६.

पूर्ण पुरुष त्या श्रीकृष्णाने, आचरण जैसे ठेवियले |

आदर्श तोचि नित्य पाळिता, कृतार्थ जीवन ते झाले || १८७.

*हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।*

*तत्त्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ॥१५॥*

**भगवंता सर्वत्र असे तूं, तुजविण कणही नसे रिता |**

**आम्ही लेकरे तूचि माऊली, जीवनी आश्रय तुझा असे || १८८.**

**वेगवेगळ्या अस्तित्वा नेशी, हात धरुनिया मार्गाशी |**

**वात्सल्याने नेशी सुपंथा, तूचि माऊली आम्हाशी || १८९**

**क्षणोक्षणी आधार तुझाचि, देह मना सावरीतसे |**

**सबाह्याभ्यंतरी व्यापिले, संकटातुनी काढीतसे || १९०..**

**पूर्व दिशेला प्रात:काळी, क्षितीज रंगते विविधांगे |**

**सुवर्णरंगी तांबुस तेजे, मंजुळ पक्षी-गीते रंगे || १९१.**

**तूचि प्रगटशी तेजरुपाने, श्रवणा-नयना तृप्ती करी |**

**उधळत मांगल्याची वर्षा, चैतन्याचे रंग भरी || १९२.**

**शीतल सुखदचि झुळुकी मधुनी, तंव वत्सल प्रत्यय येतो |**

**मोहक पुष्पे वनराईतुनी तूचि हंसतांना दिसतो || १९३.**

**वसंत वैभव पाहुनी तुझिये, आनंदाला ये भरती |**

**कोकीळ कंठे सृष्टी तृप्तीच्या, हुंकारे हर्षवी जगती || १९४.**

आपत्काली येशी धाऊनी, विविध रूपाने भगवंता |
परि दर्शन तंव प्रत्यक्षचि ना, सदैव देवा तूं लपता || १९५.

जरि सर्वत्र नि सकली असशी, पावन मुख तंव नच दिसते |
मायेचे मोहक आच्छादन, दर्शनाशी तंव लपविते || १९६.

नकोच मजला झगमगाट हा, धन-मान नि सत्कीर्ति |
मंगल वत्सल दर्शन देई, मिटवचि मोहक माया ती || १९७.

प्रसन्न होई जगन्माऊली, डोळे भरुनी बघण्याला |
जन्मोजन्मी यत्न करुनिया, प्रत्यक्षचि तूं नच दिसला || १९८.

बाजूस सारी सुवर्ण माया, घेई मज तुझियाचि कुशी |
हीच प्रार्थना तुज गोविंदा, दर्शन पावन दे मजशी || १९९.

सकल श्रुति परि हेची सांगती, इंद्रियाशी तूं विषय नसे |
नेत्रांना तूं कदा न दिसशी, मन बुद्धिच्या पैल वसे || २००.

तूं ना दिसणे,परि अनुभवणे, कारण तूं परका नाही |
भिन्न नसे तूं, माझेवाचुनी, तीचि अनुभूती मज देई || २०१.

असे मार्ग तो निजबोधाचा, तुझ्या राऊळी येण्याचा |
अद्वैतेचि तुज समरसण्याचा, मार्ग असे कैवल्याचा || २०२.

ज्ञान अचूक ते होण्यालागी चित्त-शुद्धी दे भगवंता |

पंच महायज्ञे नि कर्मे, होण्यास्तव, देई जीवनी अनुकुलता ||२०३.

हृदयीच्या तंव अस्तित्वाने, माझे निजरुप समजावे |

हरि होऊनि हरीशी भजावे, हरीमय विश्वा उमगावे || २०४.

*पूषन्नेकर्षे यम सूर्य प्राजापत्य व्यूह रश्मीन् समूह तेजः ।*

*यत्ते रूपं कल्याणतमं तत्ते पश्यामि योऽसावसौ पुरुषः सोऽहमस्मि ॥ १६ ॥*

**प्रजापत्य हे सूर्य देवते, एकलाची पोषणकर्ता |**

**तंव आधारे जीवन चाले, नमस्कार तुज भगवंता || २०५.**

**तेजोनिधी तूं, उज्वल किरणे, उजळशी तूं त्रैलोक्याला |**

**दर्शन घेणे तंव भगवंता, तेजे कठीणचि आम्हाला ||२०६.**

**डोळे दिपती, तुला पाहता, तेज न साहे नयनांना |**

**आवर रश्मी जरा आपुल्या, सहन न दर्शन घेतांना || २०७.**

**ज्ञानमयचि तंव स्वरूप निर्मल, सौम्य जाहले तंव उमजे |**

**माझे मजला मीच अनुभवी, विरले 'माझे' नि 'तुझे' || २०८.**

**सूर्यमंडळी पुरुष असे जो, मजविण कुणीही अन्य नसे |**

**तूं तर सकलांचाहि आत्मा, परमात्मा तूं दिव्य असे || २०९.**

**मज जाणवते तुजपासुनि मी, झाकळलो कि मायेने |**

**अभिन्न तुजशी सदैव असता, झाली विस्मृती अज्ञाने || २१०.**

*वायुरनिलममृतमथेदं भस्मांतँ शरीरम् ।*

*ॐ क्रतो स्मर कृतँ स्मर क्रतो स्मर कृतँ स्मर ॥ १७ ॥*

**हे भगवंता, देह सोडता, पुन्हा न जीव म्हणुनी येणे |**

**प्राण आणि इंद्रिये दहांनी. व्हावे वायुतची विरणे || २११.**

**तूचि माझे निजरुप असता, तुजमाझी मम समरसता |**

**भेद नको जीवात्मा-परमात्मा, अनुभवू दे मज अद्वैता ||२१२.**

**'असतो मा सद्गमय' प्रार्थितो, नकोचि मिथ्या संसार |**

**नको अडकवू मज भवचक्री, मायेला करुनी पार || २१३.**

**स्थूल देह हा, अग्नीमाजी पुरता भस्मसात होवो |**

**अस्तित्वहि मम जीव म्हणोनी पुन्हा न इहलोकी यावे || २१४.**

**अंत्यसमय तो जवळी येता, ॐकाराते स्मरी मना |**

**ॐकारे श्री हरी स्मरावा, आणि विरवी अलगपणा || २१५.**

**निजरुपाला ब्रह्मरुपाशी, पुरतेचि ते समरसणे |**

**उपासनेला स्मरी सद्भावे, ब्रह्माशी तद्रूप होणे || २१६.**

**यज्ञमयी हे दिव्य देवते, आठवण माझी तुज राहो |**

**अलिप्त करी मज कर्मापासुनि, बंधन कुठलेही ना हो || २१७.**

*अग्ने नय सुपथा राये अस्मान्, विश्वानि देव वयुनानि विद्वान् ।*

*युयोध्यस्मज्जुहुराणमेनो, भूयिष्ठां ते नमउक्तिं विधेम ॥ १८ ॥*

**अग्निदेवते, कृपा करावी, सन्मार्गे मजला न्यावे |**

**पावन ऐशा हरी राऊळी, तूं मजशी घेऊनी जावे || २१८.**

**भगवंता तूं साक्षीरूपाने, जाणशी ते सारे कांही |**

**येता तुझिया कुशीत देवा, विघ्ने ती टाळीत राही || २१९.**

**जीवनात मांगल्य असावे, पुरती शुद्धी ती व्हावी |**

**अहं न कृतीमाजी इवलाही, धुऊनि कर्मे अर्पावी || २२०.**

**चुकुनी मजकरवी जाहले, अयोग्य ऐसे वर्तनही |**

**विनवी त्यांतुनि पार करावे, तुजशी प्रार्थना करितो ही || २२१.**

**सदा विनम्रचि तुझिया चरणी, पूर्ण समर्पण हे तुजला |**

**विनंती तुझिया चरणी, ईश्वरा, अंत-पार ना कृपेला || २२२.**

**अग्निदेवते सन्मार्गे ने, मजला भगवंतापाशी |**

**दूर करावी सारी विघ्ने, हीच प्रार्थना प्रभु तुजशी || २२३**

**नमस्कार तुज अग्निदेवते, प्रगट नि सुप्त रूपे असशी |**

**मम वाणी नि आचरणी ही करी पावन ते तुज जैशी || २२४.**

हे तेजाचे दिव्य देवते, जीवन तूचि सांवरिले |

मार्गा चुकता जीवनकाळी, वेळोवेळी सावरले || २२५.

आता प्रार्थितो,हे निजरुपा, अस्तित्वाची ही सरिता |

परब्रह्माच्या पावन सागरी, सहजी मिळो जीवन सरता ||२२६.

सहवेना हा विरह ईश्वरा, ज्योतीत ज्योती पुन्हा मिळो |

सांत पुरे अस्तित्व माझिये, मिळुनी अनंती ते उजळो | २२७.

|| हरी ॐ ||

ईशावास्योपनिषद काव्यमय भाष्य समाप्त.

# या श्रुतीचे सार

हे उपनिषद अति प्राचीन असून त्याला दोन नांवे आहेत. प्रचलित नांव 'ईशावास्योपनिषद' हे त्याच्या सुरवातीच्या शब्दांवर आधारित आहे. त्याला 'ईशोपनिषद' असेही संबोधिले जाते , शुक्ल यजुर्वेदाच्या या उपनिषदात १८ मंत्र आहेत.

हे प्रतिपादन इतर श्रुतींच्या सारखे कुणा गुरुकरवी केले गेलेली नाही. हे सरळ उपदेश सुरु करते. पहिल्या दोन मंत्रात याचा आशय स्पष्ट व्यक्त झालेला आहे.

अध्यात्मिक जीवनाचा-ईश्वरीय ज्ञानाचे खरे ज्ञेय यांत स्पष्ट शब्दात दिलेले आहे. ईश्वर हा आपल्या जगापासून भिन्न नसून तेच प्रत्यक्ष ईश्वर स्वरूप आहे. अशी ईश्वरीय दृष्टी ठेऊन पुढचे सारे प्रतिपादन केलेले आहे.

प्रपंच दृष्टी ही भयाचे सृजन करते, परंतु ईश्वरीय दृष्टी निर्भयता देते. येथे पाहणारा-द्रष्टा आणि दृश्य एकच आहे. हे अभय म्हणजेच 'मोक्ष' होय.

तेच आपले ध्येय असून, ते ज्ञान हेच ज्ञेय आहे.

निवृत्ती की प्रवृत्ती या निवडीनुसार आपण सन्यासी वृत्तीचा की गृहस्थी वृत्तीचा अंगीकार करायचा, हे आपण ठरवू तसे स्वातंत्र आपल्याला आहे.

जे दुसऱ्याच्या मालकीचे आहे. त्यावर ‘गिधाडी’ दृष्टी’ चा त्यांत निषेध आहे हीच संन्यस्त वृत्ती असून कर्मे करीतच शतायुष्याची कामना करावीत असा स्पष्ट ‘गृहस्थी आदेश हे देते.

वृतीचि निवड आपल्या हाती असली तरी द्वैतातून अद्वैतालाच साध्य करणे हे ध्येय पहिल्या दोन मंत्रात सांगितलेले आहे. पुढचा भाग हा शिकवणुकीचा याच दोन मंत्रांचा विस्तार आहे.

तिसऱ्या मंत्रापासून ज्ञानमार्ग प्रतिपादन केलेले आहे.

आत्मज्ञान मिळविणे हाच जीवनाचा उद्देश नसेल, तर जीवन व्यर्थ आहे असा निषेध हे उपनिषद करते. त्याचा अंगीकार भले थोडा उशिरा होइल, पण ते अटळ आहे. तसे न करणारा अध्यात्मिक अंध:कारात चाचपडत जीवनाची नासाडी करतो. असे स्पष्ट बजावले आहे. अगदी स्वर्ग लाभला तरी तसले अस्तित्व त्याज्य आहे. असेच ते सांगते. अशा मार्गाचा अवलंब कारणारे आत्म्याची हत्या करतात, नव्हे ती आत्महत्याच आहे. असे उपनिषद तिसऱ्या मंत्रात स्पष्ट करते.

मंत्र ४,५,६,७ आणि ८ हे मंत्र आत्म्याचे विविध पैलू उलगडतात. आत्मा हा चैतन्य स्वरूप आहे, तो निष्कंप, निश्चल, अढळ, मनाहून वेगवान, असे आहे. सारे जग गतिमान असताही हे तत्व मात्र निश्चल आहे, अशी त्याची ओळख करून दिली आहे. ते अति तेजस्वी –‘शुक्रं’ असे आहे. शुद्ध सर्वव्यापी जाणीव हेच त्याचे स्वरूप आहे. स्थूल-सूक्ष्म

आणि कारण या तिन्ही देहापासून पूर्णतया वेगळे ते आहे. अवयव विरहित असताही पूर्ण सक्षम आहे.

शुद्ध जाणीव हे देहाच्या स्वामित्वाची-भागाची अगर त्यापासून निर्माण झालेली नसून ती स्वतंत्र तत्व आहे ही महत्वाची ओळख ध्यानी असणे आवश्यक आहे. असे ८ वा मंत्र सांगतो. त्यामुळेच तिचे अस्तित्व देह सोडल्यावर सुद्धा कायम असते.

आत्माराम सर्वव्यापी असल्याने त्याला कोठेही जावे लागत नाही, तर तो असतोच. मग मृत्यू नंतर तो देह सोडून पुढचा प्रवास करतो, असे नसून सूक्ष्म-शरीर तसे करतो. आत्मा –चैतन्य देह सोडल्यावर आपल्याजागीच असतो. देहाची पोकळी गेल्याने त्याचे अस्तित्व बंदिस्त होते  असे वाटणे हा आपल्या भ्रमाचा भाग आहे.

सूक्ष्म शरीर हा जाणीवेच्या रूपे देहाला लाभलेली त्याची उसनवारी असते. आकाशाप्रमाणे आत्मा निर्लेप असतो. पापांचा अगर क्रोध, द्वेष, आसक्ती आदींचा त्यावर परिणाम होत नाही. 'अपापवैधम' असे श्रुति सांगते. म्हणूनच त्याला 'शुद्ध म्हटले आहे. म्हणून आत्मा एकच आणि सर्वव्यापी असतो. आपण मृतात्मा म्हणून करीत असलेला उल्लेख चुकीचा आहे. देहाची खोळ टाकून दिली, त्याने त्यावर परिणाम होत नाही. त्याचे चिरंजीवित्व अबाधित राहते. मटका फुटला म्हणून आंतील पोकळी वर परिणाम नसतो, तसे. जीवात्मा आणि परमात्मा एकच असून आपण अज्ञानाने तसे म्हणतो.

जाणिवेची दोन संबोधने आहेत. एक बिंब-चैतन्य आणी दुसरे प्रतिबिंब-चैतन्य. वेगळाल्या पात्रातील पाण्यात सूर्य बिंबित होतो, तसे ते असते.

आरसा हलला म्हणजे आंतील प्रतिबिंब हलते तसे, पत्येक देहातील मन अचल असताही वेगळे प्रतिबिंबित होतांना भासते. मूळ मनातील शुद्ध जाणीवेवर वर त्याचा परिणाम होत नाही. प्रतिबिंब तात्पुरते असते. मिथ्या असते.

ज्ञानाच्या कोणत्याही उपकरणाला आत्म्याचे ज्ञान संभवत नाही. म्हणून इंद्रियांचा तो विषय नसतो. असेच चवथा मंत्र सांगतो.

त्यामुळेच ध्यान-चिंतन याद्वारा आत्मा गोचर होत नसतो. तो अंतरी सर्वव्यापी असतो. तो विषय कदापि नसतो. तो दिसत नाही पण अनुभूत होतो. आपल्या अस्तित्वाची नित्य जाणीव हीच त्याचे स्व-संवेद्यता असते. कांही विशिष्ट नसणे पण तरीही असणे हेच त्याचे अस्तित्व आहे. ते अखंड आणि अभंग असते. आकाशावर ध्यान, प्रकाशावर ध्यान होऊ शकत नाही त्याची अनुभूती मात्र प्रत्ययाला येते. तसेच जाणिवेचे आहे. तिच्यामुळेच आपल्याला अन्य अस्तित्वाचे भान येते. ती जाणीव विषय होऊ शकत नाही. पण अनुभूती होते.

आत्मा हे संपूर्ण विश्वाचे कारण असते. ते आश्रय म्हणून असल्यानेच उसने अस्तित्व टिकून असते. लेण्याला सुवर्णाचा आश्रय असतो तसे.

आत्म्याचे सर्वव्यापी असणे –अद्वैती असणे हा त्याचा एकमेव अस्तित्वाचा गुण आहे. बांगडी म्हणणे अगर सोने म्हणणे, अद्वैत हे द्वैती कार्य आणि कारण या शब्दांनी त्याची व्यक्तता व्हावी असे ते आहे. पण अद्वैत मात्र अबाधित राहते. म्हणूनच अनात्मा आणि आत्मा अशी विभागणी नसते. सारेच एक.

उपनिषद म्हणूनच म्हणते की, हे ज्ञान यथार्थ असणारा संसारापासून मुक्त होतो. चिंता, आणि संसार हे एकच. द्वैतातील अद्वैत जाणणे हीच चिंता मुक्ती. शांती, निर्भयता आणि आनंद –समाधान हे अद्वैताचे परिणाम आहेत. व्यक्ती आणि नाम, द्रव्य, पद स्वामित्व हे संसाराशी निगडीत आहेत.

भगवंत गीतेच्या सातव्या अध्यायात श्लोक २७ मध्ये सांगतात, "इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत । सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परन्तप ॥ ७-२७ ॥

"हे भरतवंशी परंतप अर्जुना, सृष्टीत इच्छा व द्वेष यांमुळे उत्पन्न झालेल्या सुखदुःखरूप द्वंद्वाच्या मोहाने सर्व सजीव अत्यंत अज्ञानाला प्राप्त होतात."

मृगजळाच्या भ्रमासारखा तो आहे. मोह हा म्हणूनच त्यागला पाहिजे. संसार मोहमय असल्याने तो सुरक्षा देत नाही. निवृत्ती मार्ग हाच संसारापासून सुटण्याचा एकमेव मार्ग आहे. सारे करून अलिप्त राहण्याने ते साध्य होते.

मंत्र ९ ते १४ मधून प्रवृत्ती उमगते. कर्म-योग आणि ईश्वर उपासना यांनीच त्यातून मुक्ती साधता येते. समर्पण हाच त्याचा अंगीकार आहे. निष्काम कर्म-योग ही वृत्ती त्याचा आधार आहे. चित्तशुद्धी त्यासाठी आवश्यक आहे. अध्यात्मिक स्तर उंचावणे त्याने शक्य होते. सकाम उपासना हि मात्र अवनती ठरते.

मन रिकामे आणि नि:शंक आणि श्रद्धायुक्त असेल तरच ज्ञानार्जन होते. व्यक्त आणि अव्यक्त दोन्हींचा समन्वय आवश्यक असतो. पंच महायज्ञ हा कर्म-योगाचाच भाग आहे. त्याने उभय प्रवृतींचा ताल आणि तोल साधतो.

मंत्र १५ ते १८ संन्यास आणि गृहस्थी दोन्ही साधतात. पूजन आणि सगुण उपासना मनाला शुद्धी करविते पण तो मोक्षाचा मार्ग नव्हे.

अद्वैत हाच एकमेव पराब्रह्माशी समरसता देतो. त्यासाठी ज्ञान-मार्ग अटळ आहे. सारी विहित कर्मे अलिप्तपणे करणे यासाठीच हा जन्म आहे.

मृत्युकाली सुद्धा अनासक्ती आवश्यक आहे. त्यावेळी पावित्र्य अनुसरणे आवश्यक आहे. त्यासाठी उपनिषद प्रार्थना सांगते. अशा तऱ्हेने प्रवृत्ती मार्गे निवृत्ती दाखविणारे हे उच्च तत्वज्ञान हे उपनिषद शिकवीत आहे. याला आत्मसात करणे हा ज्ञान मार्गाचा अवलंब आहे.

**ईशावास्योपनिषद भाष्य सारा-सहित संपूर्ण**

**आपणा सर्वांतील शिव नित्य अनुभूत होत राहो.**

**'पहा निजांगे शिव-ज्योतिर्लिंग'**


**ॐ शांतिः शांतिः शांती: ||**


**||हरी ॐ||**

**-अण्णा**

**१६/०८/२०२१.{द्वितीय श्रावणी सोमवार}**




अण्णा (श्री. मधुकर सोनवणे) यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके क्लिक/टॅप करताच उघडतील

